दाखल दिनांक : १४/११/२०२२

नोंदणी दिनांक : १४/११/२०२२

निकाल दिनांक : ०५/११/२०२४

| कालावधी | : | वर्षे | महिना | दिवस |
|---|---|---|---|---|
| | | ०१ | ११ | २२ |

CNR No. MHCH100008522022

## मुल, जि. चंद्रपूर येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, (न्यायालय क्र. २) यांच्या न्यायालयात

(पिठासीन अधिकारी : स. दि. कमलाकर)

**नियमित फौजदारी खटला क्र. ९८/२०२२** **निशाणी क्र. २६**

**प्रथम खबरी अहवालाचे विवरण –**

अपराध क्रमांक – ४९६/२०२२ दिनांक – २२/१०/२०२२

पोलीस ठाणे – मूल पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **फिर्यादी/अभियोग पक्ष** | – | महाराष्ट्र शासन द्वारा पोलीस ठाणे अधिकारी,<br>मूल पोलीस ठाणे, ता. मुल, जि. चंद्रपूर.<br>फिर्यादी – सौ. शिला गोविंदा दहीवले. |
| **अभियोग पक्षातर्फे** | – | कु. माधूरी जोगे वि. सहा. सरकारी अभियोक्ता. |
| **आरोपी** | – | संजय दिवाकर कुकूडकार,<br>वय– २५ वर्षे, धंदा– मजूरी,<br>रा. दाबगाव, ता. मूल, जि. चंद्रपूर. |
| **विधीज्ञ** | – | श्री. पी. पी. नागपूरे. |

| | |
|---|---|
| अपराधाचा दिनांक :१६.१०.२०२२ | प्रथम खबरी अहवाल दिनांक : २२.१०.२०२२ |
| आरोप पत्र दाखल दि.:१४.११.२०२२ | आरोप निश्चिती दिनांक : १२.०८.२०२४ |
| साक्षीपूरावा सुरु होण्याचा दि.: ९.१०.२०२४ | निकालासाठी राखून ठेवल्याचा दि.: ५.११.२०२४ |
| निकाल दिनांक : ०५.११.२०२४ | शिक्षेचा आदेश दिनांक : निरंक |

## आरोपीचे विवरण

| क्र. | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामीनावर सुटल्याचा दिनांक | अपराध | निर्दोष मुक्तता अथवा दोषसिध्दी | ठोठावण्यात आलेली शिक्षा | संपरिक्षे दरम्यान भोगलेला कारावास |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | संजय दिवाकर कुकूडकार | २३/१०/२०२२ | २३/१०/२०२२ | भा.दं.वि. चे कलम ३२५ व ५०४ अन्वये. | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

## अभियोग पक्षाने तपासलेल्या साक्षीदारांची यादी

| साक्षीदार क्र. | नाव | साक्षीचा प्रकार |
|---|---|---|
| १. | शिला गोविंदा दहीवले (नि. क्र. १६) | फिर्यादी |
| २. | छोटीबाई पत्रूजी गेडाम (नि. क्र. १९) | जखमी/साक्षीदार |

## बचाव पक्षाच्या साक्षीदारांची यादी

| साक्षीदार क्र. | नाव | साक्षीचा प्रकार |
|---|---|---|
| | निरंक | निरंक |

## न्यायालयीन साक्षीदारांची यादी

| साक्षीदार क्र. | नाव | साक्षीचा प्रकार |
|---|---|---|
| | निरंक | निरंक |

## अभियोग पक्षाचे निशाणी क्रमांक

| क्रमांक | निशाणी क्रमांक | पूराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| १ | १७ | तोंडी रिपोर्ट |
| २ | १८ | प्रथम खबरी अहवाल |

## बचाव पक्षाने मान्य केलेली कागदपत्रे

| क्रमांक | निशाणी क्रमांक | पूराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| | निरंक | निरंक |

## बचाव पक्षाचे निशाणी क्रमांक

| क्रमांक | निशाणी क्रमांक | पूराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| | निरंक | निरंक |

**न्यायालयाचे निशाणी क्रमांक**

| क्रमांक | निशाणी क्रमांक | पूराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| | निरंक | निरंक |

**वस्तू**

| क्रमांक | वस्तू क्रमांक | विवरण |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

## :: न्यायनिर्णय ::

(दिनांक ५ नोव्हेंबर २०२४ रोजी घोषीत)

आरोपीविरुध्द भारतीय दंड विधानाच्या कलम ३२५ व ५०४ खालील अपराधांकरीता खटला चालविण्यात आला असून अभियोग पक्षाचे कथन खालीलप्रमाणे आहे.

२] फिर्यादीने दि.१६.१०.२०२२ रोजी मुल पोलीस ठाणे येथे रिपोर्ट दिला की, त्यादिवशी सकाळी १०.३० वाजेच्या दरम्यान ती आपल्या घरी हजर असताना मौजा दाबगाव येथील सौ. सुशिला अनिल गेडाम हिने मोबाईलवरुन तिला सांगितले की, ''तुझ्या आईला आरोपीने हाताबूक्यांनी मारहाण व धक्काबूक्की केल्याने तुझ्या आईच्या उजव्या पायाचे टोंगळ्यावर सुजण आली.'' त्यानंतर फिर्यादी ही दाबगाव येथे गेली व आईला त्याबाबत विचारले असता आरोपीने तिला शिवीगाळ करुन लाथाबूक्यांनी तिच्या डावे कमरेवर मारुन तिला धक्काबूक्की केल्याचे तिने सांगितले. त्यामूळे ती खाली पडल्याने तिच्या उजव्या पायाच्या टोंगळ्याला सुजन आली. त्यामुळे फिर्यादीने आरोपीविरुध्द सदर रिपोर्ट दिला.

३] या रिपोर्टवरुन आरोपीविरुध्द उपरोक्त गुन्हा नोंदविण्यात आला. त्याचा तपास पोलीस हवालदार श्री. सुरेश ज्ञानबोनवार यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी

पंचांसमक्ष घटनास्थळ पंचनामा केला, साक्षीदारांचे जवाब नोंदविले, जखमीची वैद्यकीय कागदपत्रे हस्तगत करुन तपासकामी दाखल केली. तपासाअंती आरोपीविरुध्द सकृतदर्शनी पुरावा आढळल्याने न्यायालयात आरोप पत्र दाखल केले.

४] खटल्याकामी आरोपी हजर झाल्यानंतर मी त्याच्याविरुध्द नि.क्र.१० वर उपरोक्त कलमांखालील अपराधांकरीता दोषारोप निश्चित केला. जो त्याला वाचून व समजावून सांगितला असता त्याने तो नाकारला व संपरीक्षेची मागणी केली. खटला साक्षीपूराव्याला लागल्यानंतर फिर्यादी व आरोपी यांनी नि.क्र. १५ वर तडजोड पत्र दाखल केले. परंतू भा.दं.वि. कलम ३२५ खालील अपराध हा गंभीर स्वरूपाचा असल्याने ते फेटाळण्यात आले. त्यानंतर अभियोग पक्षाने फिर्यादीची साक्ष (नि.क्र.१६) वर आणि जखमी छोटीबाई हिची साक्ष (नि.क्र.१७) वर नोंदवून (नि.क्र.२०) वरील पूरसिस अन्वये आपला साक्षीपूरावा बंद केला. त्यानंतर निशाणी क्र. २३ वर आरोपीचे फौजदारी प्रक्रीया संहितेच्या कलम ३१३ अन्वये निवेदन नोंदविण्यात आले.

५] उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले. खालील मुद्दे माझ्या विचारार्थ निघाले असून मी त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे देत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | दि.१६.१०.२०२२ रोजी सकाळी १०.०० ते १०.३० वाजेच्या दरम्यान मौजा दाबगाव येथे आरोपीने फिर्यादीची आई छोटीबाई हिला लाथाबूक्क्यांनी तिच्या डाव्या कमरेवर मारून तिला धक्काबूक्की करून तिला इच्छापुर्वक गंभीर दुखापत पोहोचविली व त्याद्वारे त्याने | नकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| | भा.दं.वि. कलम ३२५ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | |
| २. | याच दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादीच्या आईला शिविगाळ करुन अपमानित केले व तिला सार्वजनिक शांतता भंग करण्याच्या उद्देशाने प्रक्षोभित केले व त्याद्वारे त्याने भा.दं.वि. कलम ५०४ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | नकारार्थी |
| ३. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

:: **कारणमिमांसा** ::

**मुद्दे क्र.१ व २ करीता :**

६] वरील मूद्दे एकमेकांशी निगडीत असल्याचे त्यांची कारणमिमांसा एकत्रितपणे केली आहे. फिर्यादीच्या साक्षीत असे आले आहे की, घटनेच्या दिवशी तिच्या आईचा आणि आरोपीचा वाद झाला होता. तो तिच्या आईला शिविगाळ करत होता त्यामुळे तिने भांडण सोडवायला मधे पडून आरोपीला समजावले. परंतू तो ऐकत नसल्याने तिने रागाच्या भरात त्याच्याविरुध्द पोलीस ठाण्यात रिपोर्ट दिला. त्यादिवशी आरोपीने तिच्या आईला हाताबुक्क्यांनी मारहाण केली होती व त्या मारहाणीमुळे तिच्या आईच्या टोंगळयाला मार लागला होता असे काही घडले नसल्याचे तिने म्हटले आहे.

७] तिने अभियोग पक्षास समर्थन न केल्याने वि. सहा. सरकारी अभियोक्त्यांनी तिला उलट तपासणीच्या स्वरूपातील प्रश्न विचारले असता त्यादिवशी आरोपीने तिच्या

आईला लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन तिच्या टोंगळयालाही मारहाण केली, त्यामूळे तिने त्याच्याविरुध्द पोलीस स्टेशनला नि. क्र. १७ वरील रिपोर्ट दिला होता हे तिने मान्य केले आहे. तिच्या साक्षीत पूढे असे आले आहे की, तिने आईला चंद्रपूर येथील दवाखान्यात उपचारासाठी भरती केले होते. ती तिथे एक महिना भरती होती. तिच्या टोंगळयाची वाटी बाजूला सरकल्यामुळे तिचे ऑपरेशन करण्यात आले होते. आरोपीने तिला ढकलल्यामुळे तिच्या उजव्या पायांच्या टोंगळयाची वाटी सरकली होती.

८] साक्षीदार क्र. २ छोटीबाई हिने तिच्या साक्षीत म्हटले आहे की, घटनेच्या वेळी ती घराकडून दुकानाकडे जात असताना आरोपी तिच्या मागून आला व त्याने तिला हात लावला. त्यामुळे तिला वाटले की, तो तिला मारणार आहे या भीतीने ती बाजूला सरकून तिथे असलेल्या गिट्टीवर पडल्याने तिच्या उजव्या टोंगळयाला मार लागला होता. त्या दिवशी आरोपीने तिला हाताबुक्क्यांनी मारहाण केली होती व त्या मारहाणीमुळे तिच्या टोंगळयाला मार लागला होता असे काही घडले नसनल्याचे तिने म्हटले आहे. तिने अभियोग पक्षास समर्थन न केल्याने वि. सहा. सरकारी अभियोक्त्यांनी तिला उलट तपासणीच्या स्वरूपातील प्रश्न विचारले असता त्यातून लाभदायक असे काहीही समोर आले नाही. तिला तिच्या जवाबातील रेखांकित भाग 'अ' वाचून दाखविला असता तो तिने पोलीसांना सांगितला नव्हता. परंतू तो त्यात का आहे याचे कारण ती सांगू शकली नाही.

९] फिर्यादीची साक्ष पाहता घटनेच्या वेळी ती तिथे हजर होती. आरोपी तिच्या आईला शिविगाळ करीत होता. ती त्याला समजावण्यास गेली असता तो ऐकत नसल्याने

तिने त्याच्याविरूध्द पोलीस ठाण्यात रिपोर्ट दिला. आरोपीने तिच्या आईला लाथाबूक्क्यांनी मारहाण केल्याने तिची आई जखमी झाली होती. परंतू उलट तपासात तिने मान्य केले आहे की, घटनेबाबत तिला गावातील अनिल गेडाम याने सांगितले. तिने हेही मान्य केले आहे की, घटना घडली त्यावेळी ती तिथे हजर नव्हती व घटना काय घडली व कशी घडली हे देखील तिला माहिती नाही. यावरुन हे स्पष्ट होते की, ती घटनेची प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नाही. तिने ऐकीव माहितीच्या आधारे आरोपीविरूध्द पोलीस ठाण्यात रिपोर्ट दिला. त्यामूळे जरीही वि. सहा. सरकारी अभियोक्त्यांनी तिला विचारलेल्या उलट तपासणीच्या स्वरूपातील प्रश्नांमधून त्यादिवशी आरोपीने तिच्या आईला लाथाबूक्क्यांनी मारहाण करून जखमी केल्याचे जरीही सांगितले असले तरीही तिचा एकंदरीत उलटतपास पाहता तिची साक्ष विश्वासार्ह ठरत नाही. म्हणून जरीही अभियोग पक्षाने नि. क्र. १७ वरील तोंडी रिपोर्ट सिध्द केला असला तरीही त्याला फिर्यादीच्या साक्षीतून पूष्टी मिळत नाही.

१०] घटनेची प्रत्यक्षदर्शी साक्षीदार तथा जखमी छोटीबाई हिने अभियोग पक्ष म्हणतो त्याप्रमाणे घटना घडल्याचे स्पष्टपणे नाकारले आहे. घटनेच्या वेळी आरोपी तिला हात लावल्याने तो तिला मारणार आहे असे तिला वाटल्याने ती बाजूला सरकून तिथे असलेल्या गिट्टीवर पडल्याने तिच्या उजव्या टोंगळयाला मार लागल्याचे समोर आले आहे. त्यामूळे हा संपूर्ण साक्षीपूरावा पाहता छोटीबाई हिला झलेल्या जखमांना आरोपी हाच जबाबदार आहे हे सिध्द होत नाही.

११] दोन्ही साक्षीदारांनी त्यांची आरोपीसोबत आपसात तडजोड होऊन

त्यांच्यातील वाद मिटल्याचे व त्याची आता आरोपीविरूध्द कूठलीही तक्रार राहीली नसल्याचे म्हटले आहे. त्यामूळे आरोपीविरुध्द लावण्यात आलेले आरोप जरीही गंभीर स्वरुपाचे असले तरीही त्यातील संपूर्ण घटक सिध्द होणारा पूरावा अभिलेखावर आला नाही. म्हणून त्याच्याविरुध्दचा गून्हा सिध्द होत नाही. त्यामूळे या सर्व बाबी विचारात घेता त्याची निर्दोष मुक्तता करणे न्यायोचित ठरेल असे माझे मत आहे. या कारणास्तव मी मुद्दे क्र.१ व २ उत्तर नकारार्थी देत मुद्दा क्र.३ च्या उत्तरादाखल खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१) आरोपीची फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड विधानाच्या कलम ३२५, ५०४ खालील दोषारोपातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२) आरोपीची जामीन बंधपत्रे रद्द करण्यात येतात.

३) आरोपीने फौजदारी प्रक्रीया संहितेच्या कलम ४३७–अ अन्वये ₹ १५,०००/– ची जामीन बंधपत्रे द्यावीत. ती आजपासून सहा महिन्यांच्या कालावधीसाठी वैध राहतील.

(न्यायनिर्णय खूल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)

SAMEER DILIP KAMALAKAR
Digitally signed by SAMEER DILIP KAMALAKAR
Date: 2024.11.05 17:49:01 +0530

स. दि. कमलाकर

दिनांक : ०५/११/२०२४

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र. २), मूल,
जि. चंद्रपूर.

**प्रमाणपत्र**

मी अधिकथन करते की, या पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णयामधील शब्द–नि–शब्द हे मूळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| पीठासीन अधिकाऱ्यांचे नाव | : एस. डी. कमलाकर |
| न्यायालयाचे नाव | : प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, (न्यायालय क्र.२) मुल. |
| न्यायनिर्णयाची तारीख | : ०५.११.२०२४ |
| न्यायनिर्णयावर पीठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | : ०५.११.२०२४ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | : ०५.११.२०२४ |

...........